दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२७ | सोमवार दि.२७ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्यांनी घेतला राजकीय संन्यास

बंगळुरू: ''आजचे राजकारण पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे. त्यामुळे मी २०२८ ची विधानसभा निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, मी राजकारणात सक्रिय राहीन आणि जनतेच्या सुख-दुःखाचा आवाज बनून त्यांच्यासाठी काम करत राहीन,'' अशी घोषणा कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या रविवारी (दि. २६) एक्सवर पोस्टच्या माध्यमातून केली. सिद्धरामय्या यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे की, वरुणा मतदारसंघातील जनता मला पुन्हा एकदा निवडणूक लढण्याची विनंती करत आहे, परंतु मी भविष्यात कोणतीही निवडणूक न लढण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. ''पूर्वी जेव्हा मी निवडणूक लढवायचो, तेव्हा मतदारसंघातील जनताच आमच्यासाठी निधी गोळा करायची आणि आम्हाला विजयी करायची. पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.

### झंडू कुमारने भारताचे पदक खाते उघडले

ग्लासगो: ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने अखेर पदकांचे खाते उघडले. बिहारचा पॅरा पॉवरलिफ्टर झंडू कुमार याने पुरुष हेविवेट गटात कांस्यपदकाची कमाई केली. १९० किलो वजनाची यशस्वी उचल करत त्याने १३०.९ गुण मिळवले आणि भारताला स्पर्धेतील पहिले पदक मिळवून दिले. २८ वर्षीय झंडू कुमारने ब गटामधून खेळताना पहिल्याच प्रयत्नात १८१ किलो, तर दुसरा प्रयत्नात १९० किलो वजन उचलले. त्यामुळे त्याला १३०.९ गुण मिळाले. तिसऱ्या प्रयत्नात त्याने १९६ किलो वजन उचलून बर्किंगहम २०२२ मधील स्पर्धा विक्रम मोडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अपयशी ठरला. तरीही त्याची दुसरी सर्वोत्तम उचल कांस्यपदकासाठी पुरेशी ठरली. बिहारमधील नालंदा जिह्यातील हरनौत येथील झंडू कुमार बालपणापासून पोलिओग्रस्त आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्याने वडिलांसोबत रस्त्यावर भाजीपाला विकला. कोविड काळात ई-रिक्षा चालवून घर चालवले. आज त्याच खेळाडूने राष्ट्रकुल स्पर्धेत भारतासाठी पदक जिंकत संघर्षाचे सोने केले आहे.

### पेपरफुटी रोखण्यासाठी आता मोदींची मोठी घोषणा

नवी दिल्ली : नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इन्फोसिसचे सह-संस्थापक आणि नामांकित तंत्रज्ञान तज्ज्ञ नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय 'हाय-पावर टास्क फोर्स' स्थापन करण्यात येत असल्याची मोठी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. परीक्षा पद्धत अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवणे हा या टास्क फोर्सचा मुख्य उद्देश असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडियावर व्हिडीओ संदेश शेअर करत देशातील तरुणांना आणि पालकांना आश्वस्त केले. ते म्हणाले, ''भारत सरकार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने ठोस निर्णय घेत आहे. ज्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला आहे, ते आज तुरुंगात सडत आहेत. अशा प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी आपण आधीच फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२४ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.०० क्विंटल | २,६०० | २,६८९ | २,६५७ |
| ज्वारी/हायब्रिड :९५.५० क्विंटल | २,४६० | ४,७०० | ३,२९० |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:११.५० क्विंटल | १,९८१ | २,६६३ | २,४२२ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,५०१ | ५,७७१ | ५,६३६ |

# कर्जमाफीत दोन लाख शेतकरी अपात्र

## सरकारची ५ हजार कोटींची बचत, अतिरिक्त लाभार्थ्यांना होणार फायदा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला असून, पहिल्या टप्प्यातील पडताळणीत प्राप्तिकरदाते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, सहकारी संस्थांतील उच्चपदस्थ अधिकारी आदींसह सुमारे दोन लाख शेतकरी अपात्र ठरले आहेत. या अपात्रतेमुळे शासनाच्या तिजोरीची सुमारे ४ ते ५ हजार कोटींची बचत होणार असून, हा निधी अतिरिक्त पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी वापरला जाणार आहे.**



राज्य सरकारने ही योजना जाहीर करताना सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याचा अंदाज व्यक्त केला होता. त्यासाठी ३६ हजार ५८५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ३२ लाख थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती प्राप्तिकर विभागाकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आली होती. आतापर्यंतच्या अहवालानुसार १७ लाख शेतकरी पात्र, तर दोन लाख शेतकरी अपात्र ठरले आहेत. उर्वरित १२ ते १३ लाख शेतकऱ्यांची पडताळणी अद्याप सुरू असल्याने अपात्रांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्तिकर भरणारे, आजी-माजी आमदार-खासदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त निवृत्तिवेतनधारक तसेच सहकारी संस्था आणि साखर कारखान्यांतील उच्चपदस्थ अधिकारी यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. दरम्यान, सरकारने २०१९ च्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभाची अट रद्द केली आहे. त्यामुळे यापूर्वी कर्जमाफीचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा थकीत

▶▶ पान २ वर

## धर्मेंद्र प्रधान दोन वेळा राजीनामा द्यायला तयार होते, पण केंद्राने प्रस्ताव फेटाळला?

दिल्ली । वृत्तसंस्था

**शनिवारी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिलेल्या धर्मेंद्र प्रधान यांनी, नीट पेपरफुटी प्रकरणी झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान दोनदा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती, परंतु सरकारने दोन्ही प्रस्ताव फेटाळून लावत, त्याऐवजी व्यवस्थेतील समस्या आणि शिक्षण सुधारणांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला, असे सूत्रांनी सांगितले.**



सूत्रांनी सांगितले की, २० जुलै रोजी वरिष्ठ मंत्र्यांच्या एका उच्चस्तरीय बैठकीत धर्मेंद्र प्रधान यांनी पुन्हा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली. त्यांचा राजीनामा पुन्हा एकदा नाकारण्यात आला आणि नेतृत्वाने त्यांना शिक्षण क्षेत्रातील सुधारणांचे प्रयत्न सुरू ठेवण्यास सांगितले. सरकारी सूत्रांनी सांगितले की, नेतृत्वामध्ये असा दृष्टिकोन होता की, ''मंत्र्याचा राजीनामा हा सर्वात सोपा पर्याय आहे हे जबाबदारीतून पळ काढण्यासारखे आहे. मोदी सरकार समस्यांपासून पळून जाण्याऐवजी त्या सोडवण्यावर विश्वास ठेवते. सूत्रांनुसार, कॉकरोच जनता पार्टीसोबत झालेल्या चर्चेच्या दुसऱ्या फेरीनंतर सरकारचे मत बदलले, जेव्हा या संघटनेने


▶▶ पान २ वर

# औषध निरीक्षक भरती परीक्षा पेपरफुटीचा आरोप

## १०० पैकी ९० प्रश्न व्हॉट्सअ‍ॅपवर व्हायरल झाल्याचा उमेदवाराचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती परीक्षेवर पेपरफुटीचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. २२ मार्च रोजी पार पडलेल्या या परीक्षेतील तब्बल ९० प्रश्न दोन दिवस आधीच, म्हणजेच २० मार्च रोजी व्हॉट्सअ‍ॅपवर व्हायरल झाल्याचा खळबळजनक दावा एका उमेदवाराने केला आहे. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने




तक्रारदाराचा जबाब नोंदवून पुरावे ताब्यात घेतले असून, पुढील कारवाईसाठी प्रकरण आयोगाकडे वर्ग केले आहे. तर दुसरीकडे, एमपीएससीने प्राथमिक स्तरावर हे आरोप फेटाळले असले तरी प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे.

गौरव पाटील या परीक्षार्थीने याप्रकरणी ईमेलद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि अन्न व औषध प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. १०० पैकी ९० प्रश्न परीक्षेपूर्वीच व्हॉट्सअ‍ॅपवर फिरत होते, असा दावा गौरव पाटील याने केला आहे. सुरुवातीला लोकसेवा आयोगाकडे तक्रार करूनही कोणतीही


▶▶ पान २ वर

# मी पूर्णपणे महाराष्ट्रातच कार्यरत; फडणवीसांनी फेटाळल्या राष्ट्रीय राजकारणात जाण्याच्या चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रीय राजकारणात संधी मिळणार असल्याच्या चर्चा होत्या. मात्र, या चर्चा फडणवीस यांनी फेटाळून लावल्या आहेत. आपले कार्यक्षेत्र आणि वास्तव्य हे मुंबई आणि महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असल्याचे त्यांनी सूचित केले आहे.

नागपुरात पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी मुंबईतील ठाकरेसेना आणि महाराष्ट्र नवनिर्मित सेनेच्या (मनसे) तिरंगा रॅलीवरही टीका केली. नीट पेपरफुटीसारखे मुद्दे कोणत्याही एका व्यक्तीशी किंवा पक्षाशी संबंधित नसून ते देशातील तरुणांशी निगडित आहेत, असे त्यांनी नमूद केले.



केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर फडणवीस हे राष्ट्रीय राजकारणात जाण्याच्या चर्चा सुरू असतानाच, त्यांनी शनिवारी दिल्लीची धावती भेट घेतली आणि नंतर ते नागपूरला परतले. दिल्ली भेटीबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले, मी केवळ मुंबई आणि महाराष्ट्रातच कार्यरत असल्याचे म्हटले. प्रधान यांच्या राजीनाम्याचा आनंद साजरा करण्यासाठी ठाकरेसेना आणि मनसेने मुंबईत काढलेल्या तिरंगा रॅलीला आपला कोणताही आक्षेप नाही, असेही त्यांनी सांगितले. त्यांना आनंद साजरा करण्याचे

▶▶ पान २ वर

# पेलेट गन वापरण्याची परवानगी कोणी दिली?

## विद्यार्थ्यांवरील कारवाईप्रकरणी राहुल गांधींचे अमित शहांना पत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीतील जंतर-मंतर येथे २० जुलै रोजी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष हल्ल्याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहिले आहे.

राहुल गांधी यांनी पत्रात दावा केला की, आंदोलनादरम्यान पेललेट गनचा वापर करण्यात आला असून, १९ वर्षीय एका विद्यार्थ्याच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे. या



विद्यार्थ्याची दृष्टी जाण्याची शक्यता असल्याचाही त्यांनी उल्लेख केला. पत्रात राहुल गांधी यांनी अमित शाह यांना दोन प्रश्न विचारले आहेत. ''दिल्लीतील सुरक्षा

▶▶ पान २ वर

# मतं चोरली जाऊ शकतात जनता नाही

## उद्धव ठाकरे यांची केंद्र सरकारवर टीका

मुंबई । प्रतिनिधी

देशातील तरुण मुलांनी आज एक सुवर्णपान लिहिले आहे. जात, पात आणि धर्म बाजूला ठेवून देशातील तरुण पिढी अन्यायाविरुद्ध एकत्र आली आहे, याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. मुंबईत जमलेली ही गर्दी कोणतीही निवडणूक झाल्यानंतरची नाही, तर अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकल्यानंतरची आहे. हे आंदोलन हुकुमशाहीविरुद्धच्या एका मोठ्या लढ्याची



सुरुवात असून मतं चोरता येतात, पण जनता नाही, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर घणाघाती टीका केली.

मुंबईतील शिवाजी पार्क येथील भव्य सभेत ते बोलत होते. या सभेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे

▶▶ पान २ वर

# जंतर-मंतरवरून विद्यार्थ्यांना हिंदुत्ववादी नेत्याची मारहाण

## वादग्रस्त सत्यम पंडितचा व्हिडीओ अखिलेश यादव, जितेंद्र आव्हाड यांच्याकडून व्हायरल



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सीजेपीच आंदोलन संपले आहे. दरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये हिंदुत्ववादी नेते सत्यम पंडित हे जाणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना मारहाण करताना दिसत आहेत. अखिलेश यादव, जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यांवर पोस्टद्वारे भाजप सरकारवर टीका केली आहे.

अखिलेश यादव यांनी म्हटले आहे की, भाजप आणि त्यांच्या साथीदारांकडून केली जाणारी गैरवर्तणूक, शिवराळ भाषा आणि हिंसाचार

▶▶ पान २ वर

# कारगिल विजय दिवस' अभिमानाने भरून टाकणारा

## शहीद जवानांना पंतप्रधान मोदींचा 'मन की बात' द्वारे सलाम

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**कारगिल विजय दिवस हा आपल्याला अभिमानाने भरून टाकतो. कारगिलच्या वीर जवानांनी प्रत्येक आव्हानापेक्षा मोठे धैर्य दाखवत मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण केले, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी कारगिल युद्धातील शहीद जवानांना आदरांजली वाहिली. 'मन की बात'च्या १३६व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी यांनी देशाच्या संरक्षण क्षमता, जलसंवर्धन, क्रीडा, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि स्थानिक कलांना चालना देण्यावरही भर दिला.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की,




काही तारखा अशा असतात की त्या लक्षात ठेवण्यासाठी कॅलेंडर पाहण्याची गरज नसते. २६ जुलै ही अशीच एक तारीख आहे. यावेळी त्यांनी कारगिलच्या वीरांची शौर्यगाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'विशेष शौर्य विजय यात्रे'चाही उल्लेख केला. १४ जुलै रोजी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकापासून सुरू झालेली मोटारसायकल यात्रा द्रास येथील कारगिल वॉर मेमोरियलपर्यंत जाणार आहे. 'वन राइड, वन नेशन, वन सॅल्यूट' हा या यात्रेचा संदेश आहे. भारताची संरक्षण क्षमता आणि स्वदेशी तंत्रज्ञान वेगाने मजबूत होत आहे. भारतीय नौदलात नुकतेच दाखल झालेले आयएनएस महेंद्रगिरी हे भारतातच डिझाइन आणि निर्मिती करण्यात आले असून, त्यात ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्री वापरण्यात आली आहे. तसेच डीआरडीओने पिनाका लाँग रेंज गाइडेड रॉकेट आणि कुशा मिसाइलच्या यशस्वी चाचण्या घेतल्याचेही त्यांनी सांगितले. संरक्षण उत्पादन असो, संरक्षण निर्यात असो किंवा मित्रदेशांसोबतचे राजनैतिक सहकार्य यामध्ये भारत सातत्याने नव्या उंचीवर पोहोचत आहे, असे मोदी म्हणाले. इंडोनेशियासोबत ब्रह्मोस आणि अस्त्र क्षेपणास्त्रांबाबत झालेल्या कराराचा उल्लेख करत त्यांनी भारतीय संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञानावरील जगाचा विश्वास वाढत असल्याचे सांगितले. 'कॅच द रेन' अभियानांतर्गत पावसाचे पाणी साठवणे, भूजल पुनर्भरण, जुन्या जलस्रोतांचे

▶▶ पान २ वर



अग्रलेख

# बदलत्या भारतातील विद्यार्थी शक्ती

भारतातील विद्यार्थी आंदोलने ही नवीन गोष्ट नाही. स्वातंत्र्य चळवळीपासून ते मंडल आयोग, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, नागरिकत्व कायद्यावरील आंदोलन अशा अनेक टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी इतिहासाला दिशा दिली आहे. मात्र आजची पिढी वेगळी आहे. तिच्या हातात केवळ निषेधाचे फलक नाहीत, तर स्मार्टफोन आहे. तिचे व्यासपीठ केवळ रस्ते नाहीत, तर सोशल मीडिया आहे. त्यामुळे आजचे आंदोलन केवळ एका शहरापुरते मर्यादित राहत नाही, तर काही मिनिटांत संपूर्ण देशात पोहोचते.

परीक्षेतील कथित प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांविरोधात दिल्लीत सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने याच बदलत्या वास्तवाची प्रचिती दिली आहे. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांमध्ये आहे. परीक्षा म्हणजे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा असतो. अशा वेळी प्रश्नपत्रिका फुटीच्या घटना घडल्यास केवळ परीक्षा रद्द होत नाही, तर विद्यार्थ्यांच्या परिश्रमांवर, मानसिक आरोग्यावर आणि भविष्यावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे अशा प्रश्नांवर विद्यार्थी रस्त्यावर उतरले, यात आश्चर्य नाही. या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सोशल मीडियाचा वापर. आंदोलनातील व्हिडिओ, छायाचित्रे, प्रत्यक्ष अनुभव आणि प्रतिक्रिया काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचल्या. आंदोलनाचे समर्थक असोत किंवा विरोधक, दोघांनीही डिजिटल माध्यमांचा वापर करून आपापली भूमिका मांडली. त्यामुळे माहितीवर एका बाजूचे वर्चस्व राहिले नाही. सरकार, विरोधक, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवादाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. मात्र सोशल मीडियाची ही ताकद जितकी प्रभावी आहे, तितकीच ती धोकादायकही ठरू शकते. संपादित व्हिडिओ, अपूर्ण माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश आणि ट्रोल संस्कृती यामुळे वास्तव आणि प्रचार यातील सीमारेषा धूसर होतात. त्यामुळे कोणत्याही व्हायरल माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची पडताळणी करणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे असले तरी त्यासोबत तथ्यांची जबाबदारीही तितकीच आवश्यक आहे. सरकारसमोरही या आंदोलनाने काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत. प्रश्नपत्रिका फुटी रोखण्यासाठी कठोर कायदे करणे पुरेसे नाही. परीक्षाप्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा आणि दोषींवर वेळेत कारवाई ही तितकीच आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवणे हे कोणत्याही सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असते. दुसरीकडे, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनीही संविधानाने दिलेल्या शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा द्वेषपूर्ण प्रचार यामुळे कोणत्याही आंदोलनाची नैतिक ताकद कमी होते. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आणि कायद्याचे पालन या दोन्ही गोष्टी एकत्र नांदल्या पाहिजेत. आजची 'जनरेशन झेड' केवळ सोशल मीडियावर मनोरंजन करणारी पिढी नाही, तर डिजिटल माध्यमांचा वापर करून प्रश्न विचारणारी, पुरावे जतन करणारी आणि सार्वजनिक चर्चेला दिशा देणारी पिढी म्हणून पुढे येत आहे. ही बाब भारतीय लोकशाहीसाठी सकारात्मक ठरू शकते, जर संवाद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मूल्यांना त्याची जोड मिळाली तर.

विद्यार्थ्यांचा आवाज दाबून प्रश्न सुटत नाहीत, तसेच केवळ डिजिटल ट्रेंड निर्माण करूनही व्यवस्था बदलत नाही. विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था, उत्तरदायी शासन, जबाबदार नागरिक आणि संयमी लोकशाही संवाद या चार स्तंभांवरच शिक्षण व्यवस्थेचे भविष्य उभे राहील. भारतातील विद्यार्थी आंदोलनांनी आता रस्त्याबरोबरच मोबाईलच्या स्क्रीनवरही आपली जागा निर्माण केली आहे. या नव्या वास्तवाकडे सरकार, समाज आणि शिक्षण व्यवस्था यांनी संघर्ष म्हणून नव्हे, तर सुधारणा करण्याची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे.

# पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त बीडच्या कला क्षेत्राला पाठबळ-डॉ.योगेश क्षीरसागर

* बीडमध्ये 'नादवेध' संगीत महोत्सव; डॉ.योगेश क्षीरसागरांकडून आयोजन
* 'ताल साधना म्युझिक सर्कल'चे उदघाटन; कलावंतांचा विशेष पुरस्काराने सन्मान





बीड । प्रतिनिधी

**मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा विचार होता. त्यांचा वाढदिवस तरुणाईला दिशा देणारा ठरेल. ज्यांना परिस्थितीमुळे कला शिकता आली नाही, त्यांना मोफत शिक्षण मिळावे, यासाठी ताल साधना म्युझिक सर्कलच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले. अलीकडे डीजेवरच गर्दी होताना दिसते, मात्र, सांस्कृतिक कार्यक्रमालाही बीडमध्ये होणारी गर्दी कला क्षेत्रासाठी मोठी बाब आहे. पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त बीडच्या** कला क्षेत्राला पाठबळ मिळत आहे, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी (दि.२६) 'नादवेध' संगीत महोत्सव, ताल साधना म्युझिक सर्कलचे उदघाटन आणि कलावंतांना पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालनाट्य परिषदेच्या अध्यक्षा, प्राचार्य दिपाताई क्षीरसागर ह्या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.क्षीरसागर यांच्यासह ह.भ.प.अमृत महाराज जोशी, प.पु.विशाल महाराज रामदासी, पंडित अरविंदकुमार आझाद गुरुजी, संपादक संतोष मानुरकर, कृष्णा साळुंके आदींची उपस्थिती होती. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, मंडळ प्रमुख मनोज पाटील, भरतअण्णा लोळगे, सतीश सुलाखे, एकनाथ महाराज पुजारी, सुदर्शन धुतेकर, के. सी. चव्हाण, डॉ. वासुदेव निलंगेकर, वासुदेव काळजे, प्रियंका देशमाने, सुरंजन जायभाये, नरहरी दळे, अभिषेक काकडे, कृष्णा शिंदे, नगरसेवक नितीन साखरे, आदित्य माने, शुभम धूत, गणेश लांडे, डॉ.लक्ष्मण जाधव, सुंदर चव्हाण, अजय सवई, शांतिनाथ डोरले, सुभाष क्षीरसागर, अनिल चांदणे, सुलभा पाटील, अरुण बोंगाणे, प्रा.शिवानंद क्षीरसागर, विठ्ठल गुजर, डॉ.रमेश शिंदे, शुभम कातांगळे, राजू माहुवाले, विश्वास आखाडे, शरद बडगे, संग्राम बांगर, सुशील जाधव, अमोल वडतिले आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह सौ. के.एस.के. विद्यालयाच्या पुढाकारातून करण्यात आले होते. प्रास्ताविक तबला वादक प्रकाश मानुरकर यांनी केले. सूत्रसंचलन दिपक बिल्पे यांनी केले. आभार प्रा.संजय पाटील देवळाणकर यांनी मानले. यावेळी भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते, संगीतप्रेमी, विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### या कलावंतांचा सन्मान; उत्कृष्ट सादरीकरण

मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे उध्दवशास्त्री घाडगे, डॉ.शुभम कुलकर्णी, प्रा.चिन्मय पुजारी, प्रा.कृष्णा रामदासी, अनुराधाताई चिंचोलकर यांचा सन्मान करण्यात आला. संगीत महोत्सवात पंडित अरविंदकुमार आझाद गुरुजी यांनी सादर केलेल्या तबला सोलोने रसिकांची दाद मिळवली, तर कृष्णा साळुंके यांच्या पखवाज सोलोने कार्यक्रमाची रंगत अधिक खुलवली. तसेच, नृत्य क्षेत्रातील गार्गी कुलकर्णी यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

### क्षीरसागर कुटुंबियांनी कला क्षेत्राचा वारसा जोपासला-अमृत महाराज जोशी

ह.भ.प. अमृत महाराज जोशी म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर हे स्वतः गायक, तबला वादक आहेत. त्यांच्या आजी स्व.केशरकाकू क्षीरसागर ह्या नाटकात सक्रिय असायच्या, तर दुसऱ्या आजी स्व.सुहासिनी ईर्लेकर ह्या कलावंत होत्या. आजींसोबतच आई डॉ.दिपाताई यांच्याकडून कला, साहित्याचा वारसा डॉ.योगेश यांना मिळाला. क्षीरसागर कुटुंबियांनी कला क्षेत्राचा वारसा जोपला, असे आवर्जून नमूद केले. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्ताने हा अनोखा उपक्रम राबविला जातोय. त्यांना दीर्घायुष्य लाभावे, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या.

### विशाल महाराज रामदासी, डॉ.दिपाताई क्षीरसागरांकडून उपक्रमास शुभेच्छा

प्रमुख अतिथी विशाल महाराज रामदासी म्हणाले, बीडच्या कला-संगीत क्षेत्राला चालना मिळत आहे. नव्या उपक्रमातून कलावंत घडतील. तर उदघाटक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी पंकजाताई मुंडे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. संगीत क्षेत्राचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली, ही माझी स्वप्नपूर्ती आहे, असेही त्या म्हणाल्या.

### 'ताल साधना म्युझिक सर्कल'मध्ये १ ऑगस्टपासून मोफत प्रवेश सुरू

के.एस.के. महाविद्यालयांतर्गत सुरू होत असलेल्या 'ताल साधना म्युझिक सर्कल, बीड' येथे संगीत व नृत्य प्रशिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मार्गदर्शक म्हणून नामदेव साळुंके (शास्त्रीय गायन), पल्लवी कीर्तीकर (कथ्थक नृत्य), प्रकाश मानुरकर (तबला वादन) आणि अभिषेक लोळगे (पखवाज वादन) हे कार्यरत राहणार आहेत. १ ऑगस्टपासून वर्गांना प्रारंभ होणार असून, प्रवेश मर्यादित असल्याने इच्छुक विद्यार्थी व पालकांनी त्वरित प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीची माजलगावात दिंडी; भक्तिमय वातावरणात ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

**जाती-धर्माच्या भिंती तोडून समता, बंधुता आणि विठ्ठलभक्तीचा संदेश देणारा वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा पाठीचा कणा आहे. हाच थोर वारसा आणि संस्कार बालवयातच विद्यार्थ्यांच्या मनात रुजावेत, या उद्देशाने शहरातील नामांकित फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी' (भाटवडगाव) च्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून भव्य 'पायी दिंडी' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

मागील ११ वर्षांपासून सुरू असलेली ही अखंड परंपरा यंदाही अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.या निमित्ताने १००० हून अधिक बालवारकऱ्यांनी महाराष्ट्राचा वारकरी संस्कृतीचा वारसा जपला त्याच बरोबर सामाजिक संदेशाने वेधले नागरिकांचे लक्ष वेधले.माऊलींच्या जयघोषाने माजलगाव नगरी दुमदुमली शाळा परिसर ते बायपास मुख्य रस्त्यावरील मंगलनाथ मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या या पायी दिंडीत इयत्ता २ री ते १० वीचे जवळपास ७०० विद्यार्थी प्रत्यक्ष वारकरी वेशात सहभागी झाले होते. याशिवाय पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागासह एकूण १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी या पायी दिंडी सोहळ्यात हजेरी लावली.सजलेली पालखी सुंदर हार-फुलांनी सजवलेली विठ्ठल-रुक्मिणीची पालखी हे या दिंडीचे मुख्य ठरले.वारकरी रूप हातात टाळ-मृदंग, डोक्यावर तुळशीवृंदावण, कपाळावर गोपीचंदन अन् मुखात ज्ञानबा-तुकाराम व विठ्ठल-विठ्ठल विठ्ठला चा गजर करत लहानग्या वारकऱ्यांनी अवघी माजलगाव नगरी भक्तिरसात न्हाऊन काढली. दिंडीतील मुख्य वैशिष्ट्ये आणि सामाजिक संदेश रिंगण व कवायती छत्रपती संभाजी महाराज चौकात दिंडी आल्यानंतर विद्यार्थिनींनी अभंगाच्या



तालावर लयबद्ध ठेका धरत आकर्षक फुगडी व रिंगण करून शारीरिक कवायती सादर केल्या. हे दृश्य उपस्थितांचे डोळे दीपवणारे होते.आरोग्य संदेश वैद्यकीय वेशभूषेत सज्ज असलेल्या विद्यार्थिनींनी हातात वैद्यकीय किट्स घेऊन 'आरोग्य हीच संपत्ती' आणि प्रथमोपचाराचे महत्त्व या दिंडीत अधोरेखित केले. स्वच्छता अभियान 'स्वच्छता हीच ईश्वरसेवा' हा संदेश देत सफाई सेवेकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थिनींनी दिंडी मार्गावरील कचरा गोळा केला. त्यांच्या या उपक्रमाचे नागरिकांनी उभे राहून कौतुक केले.अत्यंत शिस्तबद्ध रीतीने पार पडलेल्या या दिंडी सोहळ्याचे नियोजन शाळेचे संस्थापक,पांडुरंग चांडक,जगदीश चांडक मुख्याध्यापक,सारिका बजाज, सचिन गायकवाड, ज्योती बनसोडे, रमेश बाहेती, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम करून विद्यार्थी दिंडीचे आयोजन केले होते.यावेळी संचालक अण्णासाहेब तौर, प्रभाकर शेटे,रमेश बाहेती,नामदेव लव्हाळे सह असंख्य पालक उपस्थित होते.

# बाळराजे पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण व शालेय साहित्याचे वाटप




बीड । प्रतिनिधी

**राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने बीड तालुक्यातील रामनगर येथे माजी तालुका प्रमुख अशोक मामा घोलप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वृक्षारोपण आणि शालेय साहित्याचे वाटप केले. या कार्यक्रमासाठी गेवराई तालुक्याचे नेते बाळराजे पवार, युवा नेते यशराज पंडित आदींची उपस्थिती होती.**

या कार्यक्रमास या कार्यक्रमास बीड भाजपाचे ज्येष्ठ नेते कार्यकर्ते आणि रामनगर येथील युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी अशोक मामा घोलप यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रमानंतर सामूहिक भोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशोक घोलप हे पक्षाच्या विविध कार्यक्रमाबरोबरच सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सक्रिय सहभाग असतो. वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या वाटपाच्या या सामाजिक कार्यक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## पान १ वरून...

### कर्जमाफीत दोन लाख

झालेल्या १२ ते १३ लाख शेतकऱ्यांनाही आता दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पहिल्या टप्प्यात अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांमुळे वाचणारा ४ ते ५ हजार कोटींचा निधी या अतिरिक्त पात्र लाभार्थ्यांसाठी वापरण्यात येणार असल्याने शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले. थकबाकीदार शेतकऱ्यांनंतर आता नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनपर अनुदानासाठीही याच पात्रता-अपात्रतेचे निकष लागू केले जाणार आहेत. गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांपर्यंतच योजनेचा लाभ पोहोचावा, हा शासनाचा उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे.

------------

### औषध निरीक्षक भरती परीक्षा

दखल घेतली गेली नाही, असा आरोपही त्याने केला आहे. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने गौरव पाटील यांना बोलावून त्यांचा सविस्तर जबाब नोंदवून घेतला. तसेच त्यांच्याकडे असलेले व्हॉट्सअॅप चॅट आणि इतर पुरावे ताब्यात घेतले आहेत. हे सर्व पुरावे आणि प्रकरण पुढील चौकशीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवण्यात आले आहे. दरम्यान, पेपरफुटीच्या या दाव्यांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपली बाजू स्पष्ट केली आहे. २२ मार्च रोजी परीक्षा पार पडली, त्यावेळी अशी कोणतीही तक्रार आलेली नव्हती. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त तक्रारीच्या आधारे चौकशी सुरू करण्यात आली असून, चौकशीत तथ्य आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. संबंधित तक्रारीच्या चौकशीत तथ्य आढळले नाही आणि केवळ बदनामी करण्याच्या हेतूने आरोप केले गेल्याचे निष्पन्न झाल्यास, आयोगाची बदनामी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिला आहे.

-------------

### धर्मेंद्र प्रधान दोन वेळा राजीनामा द्यायला

२० जुलैच्या 'चलो संसद' आंदोलनासारखाच दुसरा मोठा मोर्चा काढण्याची धमकी दिली. २० जुलैच्या आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईमुळे अनेक विद्यार्थी जखमी झाल्याने सरकार आधीच चिंतीत होते. देशद्रोही घटक या अशांततेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा इशारा देणारे अहवाल सुरक्षा यंत्रणांनीही सादर केले होते. सूत्रांनी सांगितले की, डिजिटल पाळत ठेवण्याच्या यंत्रणेत ४०० हून अधिक सोशल मीडिया खाती आढळून आली, ज्यात पाकिस्तानमधून चालवल्या जाणाऱ्या सुमारे १०० इंस्टाग्राम खात्यांचा समावेश होता. ही खाती भारतातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सक्रियपणे खतपाणी घालत होती. जंतर मंतर परिसरातील तणाव कमी करण्यासाठी आणि आंदोलनांची पुढील व्युव्हरचना रोखण्यासाठी, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आणि अखेरीस राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. काही तासांनंतर, कॅबिनेट मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

-------------

### पेलेट गन वापरण्याची

यंत्रणा अखेर गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे गृहमंत्री म्हणून विद्यार्थ्यांवर पेलेट गन वापरण्यास तुम्ही मंजुरी दिली होती का? जर नाही, तर ही परवानगी कोणी दिली?'' असा सवाल त्यांनी केला आहे. याशिवाय आंदोलनादरम्यान साध्या वेशातील काही व्यक्ती विद्यार्थ्यांना लाठ्यांनी मारहाण करताना दिसत असल्याचा उल्लेख करत, ''हे लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक? त्यांची नियुक्ती कोणी केली?'' अशीही विचारणा राहुल गांधी यांनी केली. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे नमूद करत राहुल गांधी म्हणाले की, आंदोलकांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या मागण्यांवर संवादातून तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांवर झालेली हिंसक कारवाई लोकशाहीच्या सर्व मर्यादा ओलांडणारी असून, देशभरात संतापाची लाट उसळल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दरम्यान, राहुल गांधी यांनी शनिवारी सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी दिल्लीतील आंदोलनादरम्यान जखमी झाल्याचा दावा करण्यात आलेल्या साहिल नावाच्या विद्यार्थ्याचा व्हिडिओ शेअर केला. पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले, ''हातात तिरंगा घेऊन स्वच्छ आणि पारदर्शक परीक्षा व्हावी, एवढीच मागणी करणाऱ्या साहिलवर पोलिसांनी पेलेट गन चालवून गंभीर जखमी केले. ही ब्रिटिश राजवटीची क्रूरता नाही, तर स्वतंत्र भारतातील मोदी सरकारची निर्दयी वागणूक आहे. आपल्या हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या विद्यार्थ्यांना न्यायाऐवजी पेलेट मिळत आहेत.'' या आंदोलनादरम्यान झालेल्या धक्काबुक्कीमध्ये विशेष पोलीस आयुक्त, संयुक्त आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ११८ हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच सुमारे ६० आंदोलकही जखमी झाल्याचे समोर आले आहे.

-------------

### मी पूर्णपणे महाराष्ट्रातच कार्यरत; फडणवीसांनी

कारण मिळाले याचा मला आनंद आहे. आम्हालाही आनंद आहे, कारण असे मुद्दे (नीट पेपरफुटी) कोणत्याही व्यक्तीशी किंवा पक्षाशी संबंधित नसून ते देशातील तरुणांशी निगडित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत संवेदनशीलतेचे दर्शन घडवले आणि देशाच्या हिताचा निर्णय घेतला, असे फडणवीस म्हणाले. केंद्र सरकार सोमवारी लोकसभेत सार्वजनिक परीक्षा (अयोग्य मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६ मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. हे विधेयक आपल्या देशातील आणि जगातील अशा प्रकारचे पहिलेच विधेयक असेल. तसेच, तिरंगा रॅलीदरम्यान केलेल्या विधानांवरून त्यांनी ठाकरेसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली. गेल्या १० वर्षांत उद्धव ठाकरे यांनी अनेकदा अशी विधाने केली आहेत, परंतु त्यांच्या बोलण्याचा काहीच परिणाम होत नाही, कारण संपूर्ण देश पंतप्रधान मोदींच्या पाठीशी उभा आहे, असे त्यांनी नमूद केले.

--------------

### जंतर-मंतरवरून विद्यार्थ्यांना

सर्वांनी पाहिला पाहिजे. त्यांची हिंमत पहा, तरुणांना आश्वासने देऊन काही तास उलटले नाहीत तोच, आपल्या इतिहासाला साजेसे असे हे भाजप सदस्य पुन्हा एकदा त्यांचा विश्वासघात करत आहेत. हा सुसंस्कृत भाजप नेता आपल्याच वरिष्ठ नेतृत्वाने दिलेल्या आश्वासनांचे उघडपणे उल्लंघन करत आहे आणि त्याचे व्हिडिओही रेकॉर्ड करत आहे. डबल-इंजिन सरकारमधील अंतर्गत संघर्षामुळे हे घडत आहे का? त्याला त्वरित अटक झाली पाहिजे, अशी मागणी अखिलेश यादव यांनी केली आहे. जितेंद्र आव्हाड यांनीही भाजपवर टीका केली आहे. ते म्हणाले की, ''राष्ट्रीय हिंदू वीर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्यम पंडित यांनी आंदोलनावरून परतत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण केली. व्हिडिओ बघा आणि लक्षात ठेवा की हीच लोक भाजपला बुडवणार आहेत या देशात.'' सत्यम पंडित स्वतःची ओळख हिंदू वीर सेनाचा अध्यक्ष म्हणून सांगतो. बांगलादेशी आणि रोहिंग्यांबाबत प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी त्याला यापूर्वी ऑगस्ट २०२४ मध्ये अटक करण्यात आली होती. फेब्रुवारी २०२६ मध्ये, मांस विक्रीची दुकाने बंद करण्याची मागणी करत असताना त्याने मांस विक्रेत्यांवर हल्ला केला होता. आता हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

----------

### मतं चोरली जाऊ शकतात जनता ना

यांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेच्या सुरुवातीला नीट पेपरफुटी प्रकरणामुळे निराश होऊन जीवन संपवलेल्या २१ विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उद्धव ठाकरे म्हणाले, देशातील तरुण मुलांनी आज एक सुवर्णपान लिहिले आहे. जात, पात आणि धर्म बाजूला ठेवून देशातील तरुण पिढी अन्यायाविरुद्ध एकत्र आली आहे, याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. आज देशातील तरुण जागा झाला आहे आणि हेच चित्र देशाच्या भविष्यासाठी आशादायक आहे. विद्यार्थ्यांचे हे आंदोलन एका मोठ्या लढ्याची सुरुवात आहे. हा संघर्ष भाजप विरुद्ध भारत असा आहे. या संघर्षात जातपात, धर्म विसरुन सहभागी व्हा. मी भारतीय आहे, ही जाणीव ठेवा. एका झुरळाने हुकूमशहाला नमवले आहे. मोदीजी आतातरी देशाकडे लक्ष द्या. तुमचे मंत्री त्यांचे काम सोडून इतर पक्ष फोडण्यात व्यस्त आहेत. त्यांना आतातरी म्हणा देशाचे काम करा, असा टोलाही त्यांनी लगावला. तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन महागाई, घसरणारा रुपया यावर एक शब्द बोलत नाहीत. फक्त पेपरफुटीचे फायदे सांगत आहेत. राजनाथ सिंह हे देशाचे संरक्षणमंत्री आहेत, पण आता ते धर्मेंद्र प्रधानांचे रक्षण करत होते. आपले खड्डामंत्री माफ करा, रस्तेमंत्री नितीन गडकरी हे इथेनॉलवर बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली. मला मोदींना सांगायचे आहे की, तुम्हाला तुमच्या लाडक्या धर्मेंद्रला मंत्रिमंडळातून काढताना किती यातना झाल्या. त्यापेक्षा जास्त यातना नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना झाल्या असतील. ही ठिणगी आता जागती ठेवणे आपल्या सगळ्यांचे काम आहे. आता आलेली ही जाग जाऊ देऊ नका, सत्ताधाऱ्यांची मस्ती सहन करु नका. तुम्ही जनतेची ताकद दाखवून दिली आहे. या देशाला पुन्हा कोणीही कमकुवत करू देऊ नका, असे आवाहनही त्यांनी तरुणाईला केले.

-------------

### कारगिल विजय दिवस'

पुनरुज्जीवन आणि वृक्षारोपणाला चालना दिली जात आहे. आपल्या परिसरातील एखाद्या तलावाची, विहिरीची किंवा बावडीची जबाबदारी घेऊया. आज वाचवलेला पाण्याचा प्रत्येक थेंब हा भविष्यातील पिढ्यांसाठी मोठी संपत्ती आहे, असे आवाहन त्यांनी केले.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. २७ जुलै २०२६




## थोडक्यात



### श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, (क्रांतीनगर) येथे सरस्वती पूजन, गुरुपूजन व मातृ-पितृ पूजन उत्साहात संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ दिंडोरी प्रणीत मार्गांतर्गत श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, पाटोदा (क्रांतीनगर) येथे रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी सरस्वती पूजन, गुरुपूजन आणि मातृ-पितृ पूजन सोहळा भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व नितीनभाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात पालक, शिक्षक, लहान मुले तसेच सेवेकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सुमारे १०० ते ११० सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.


कार्यक्रमात संस्कारक्षम पिढी घडविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लहान मुलांकडून आपल्या आई-वडिलांचे अत्यंत आदरपूर्वक व भावनिक वातावरणात पाद्यपूजन करण्यात आले. तसेच सरस्वती पूजन व विद्यारंभ पूजनही विधीवत पार पडले. मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत गुरू, माता-पिता आणि विद्येप्रती आदर व्यक्त केला.

या प्रेरणादायी उपक्रमामुळे केंद्रात आध्यात्मिक, संस्कारमय आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. उपस्थित पालक, सेवेकरी व बालगोपाळांनी कार्यक्रमाचे कौतुक करत अशा संस्कारवर्धक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी भावना व्यक्त केली.

### दिंद्रुडच्या जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेचा स्कॉलरशीप परीक्षेत दैदिप्यमान निकाल

दिंद्रुड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या-मुलांची), दिंद्रुड येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत



घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. यंदा शाळेतील तब्बल ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्याने शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ईश्वरी शिवहार कटारे (२४६), संघर्ष आश्रुबा काळे (२४६), सोनाली आश्रुबा किचमे (२४४), गायत्री भागवत पारेकर (२४०), संस्कृती गोविंद खडके (२४०), धनश्री कैलास दळवे (२३८), शिवांश दादासाहेब वकरे (२३८), तनिष्का रवि मांयदळे (२३६), महेक मुक्तार शेख (२३२), माहेश्वरी विजय कदम (१६८) आणि सांची रामेश्वर देशमाने (१६८) यांचा समावेश आहे.या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना केंद्रीय मुख्याध्यापक मनोहर कटारे यांनी व्यक्त केली. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष बॅचला सहशिक्षिका मीरा फपाळ तसेच सहशिक्षक अनिल धनशेट्टी, विजय आडे आणि सिद्धेश्वर बोकन यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# बंजारा समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध -संजय राठोड

## स्व.वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त वडवणी येथे बंजारा समाजाचा मेळावा





वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त वडवणी येथे बंजारा समाजाच्या वतीने भव्य समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी प्रमुख उपस्थिती लावत समाजबांधवांशी संवाद साधला. त्यांच्या आगमनावेळी बंजारा समाजातील नागरिकांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या निनादात, फटाक्यांची आतषबाजी करत आणि घोषणांनी परिसर दणाणून सोडत उत्स्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. वसंतरावजी नाईक यांनी राज्याच्या विकासासाठी, शेती क्षेत्रासाठी आणि ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने पुढे नेण्याचे आवाहन केले.

मेळाव्यात बोलताना मंत्री संजय राठोड यांनी बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, जलसंधारण आणि सामाजिक विकासाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांवर सकारात्मक विचार करून शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या मेळाव्याला बंजारा समाजातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे वडवणी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिस्तबद्ध नियोजन आणि समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा मेळावा यशस्वी ठरला.

### इरा इंग्लिश स्कूलच्या बालवारकऱ्यांनी घडविले सामाजिक भानाचे दर्शन

## विठ्ठल-रुक्मिणीच्या रूपातील बालगोपालांनी वेधले लक्ष; पेपरफुटी, शिक्षण क्षेत्र व विद्यार्थी आंदोलनावर जनजागृती




युसूफवडगांव । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात काढण्यात आली. टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठलनामाचा जयघोष आणि संतांच्या वेशभूषेतील बालवारकऱ्यांमुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या दिंडीत विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह विविध संतांची वेशभूषा साकारली होती. विठ्ठल-रुक्मिणीच्या रूपातील बालगोपालांनी सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वारकरी वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी भक्ती, संस्कृती आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम घडवून आणला.विशेष म्हणजे, इरा इंग्लिश स्कूलच्या या वारकरी दिंडीला सामाजिक संदेशाची जोड देण्यात आली होती. पेपरफुटीच्या घटना, शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न तसेच सध्या सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत विद्यार्थ्यांनी फलक व संदेशांच्या माध्यमातून जनजागृती केली.

'ज्ञानाची वारी, शिक्षणात पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी जागरूकता' असा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून बालवयातच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्याचा प्रेरणादायी प्रयत्न करण्यात आला.आषाढी एकादशीच्या निमित्ताने भक्तीबरोबरच सामाजिक प्रश्नांवरही भाष्य करणारी इरा इंग्लिश स्कूलची ही वारकरी दिंडी परिसरात चर्चेचा विषय ठरली. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.दिंडीच्या यशस्वीतेसाठी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक बापूसाहेब भुसारी,शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



### अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

किल्लेधारूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश अंडील यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनाली अंडील यांच्या सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. अजितदादा पवार यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी असे उपक्रम राबविणे गरजेचे असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक बैठक ३० ऑगस्ट रोजी रायगडच्या पायथ्याशी पाचाड येथे

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक बैठक ३० ऑगस्ट २०२६ रोजी रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथे (महाड, जि. रायगड) एस. एम. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे..

रायगड प्रेस क्लब संलग्न महाड प्रेस असोसिएशन या बैठकीचे आयोजन करणार आहे..बैठकीस सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, परिषद प्रतिनिधी, जिल्हा अध्यक्ष, अधिस्वीकृती समितीवरील परिषदेचे सदस्य, डिजिटल मिडिया परिषदेच्या पदाधिकारयांनी उपस्थित राहावे असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोकण विभागीय सचिव मनोज खांबे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, महाड प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण कुलकर्णी यांनी केले आहे..

बैठकीत उदगीर अधिवेशन यशस्वी केल्याबद्दल सचिन शिवशेट्टे आणि त्यांच्या टीमचा सत्कार करण्यात येणार आहे.. तसेच परिषदेचे नवे अध्यक्ष म्हणून शिवराज काटकर हे अध्यक्षपदाची सूत्रे याच बैठकीत हाती घेतील, त्यांचे स्वागत करण्यात येईल..

परिषदेचा विस्तार देश पातळीवर करण्यात येत आहे, त्यासाठी शेजारी राज्यात शाखा स्थापन करण्यात येणार आहेत.. त्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. पुरस्कार वितरणाच्या बाबतीत चर्चा करून तारीख आणि स्थळ निश्चित करण्यात येणार आहे..

दुपारी ११ ते १.३० बैठक होईल.. त्यानंतर छत्रपती शिवरायांची राजधानी असलेले किल्ले रायगड दर्शन कार्यक्रम होईल.. सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकास भेट देऊन महामानवास अभिवादन केले जाईल. नियोजनाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे यासाठी आपण बैठकीस येत असल्याचे मनोज खांबे यांना कळवावे असे आवाहन करण्यात आले आहे. बस किंवा ट्रेनने येणाऱ्या प्रतिनिधींची महाड ते पाचाड जाण्याची व्यवस्था केली जाईल, पण त्यासाठी पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. मुंबईहून कोकणात जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड़्या महाडवरून जातात, बहुतेक गाड्यांचा थांबा महाडला आहे.. पुण्यावरून येणाऱ्यांना बसने किंवा स्वतःचया गाडीने वरंध किंवा अंबेनळी घाटातून येता येईल...

## ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात खोलेश्वर विद्यालय, दिंद्रुड येथे भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा उत्साहात साजरा

दिंद्रुड । प्रतिनिधी



आषाढी एकादशीचे औचित्य साधून खोलेश्वर विद्यालय, दिंद्रुड येथे पारंपरिक दिंडी सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. ज्ञानोबा-तुकाराम यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदुंग, वीणा आणि भगव्या पताकांसह दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अभंग, भजन आणि हरिनामाच्या गजरात काढण्यात आलेल्या दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी विद्यार्थ्यांना दिंडी परंपरेचे महत्त्व, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या विचारांचा वारसा, तसेच वारकरी संप्रदायातील समता, बंधुभाव, शिस्त, सेवा आणि भक्ती या मूल्यांची माहिती देण्यात आली. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल आदर, सामाजिक ऐक्याची भावना आणि नैतिक मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन करण्यात आले. तसेच भक्त पुंडलिक यांच्या जीवनावर आधारित नाटिका व भक्ती गीते सादर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरिता फपाळ मॅडम, रोहिणी पारेकर मॅडम सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या भक्तिमय दिंडी सोहळ्यामुळे विद्यालय परिसर वारकरी संप्रदायाच्या भक्तिरसाने न्हाऊन निघाला. दिंडी नंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद वाटण्यात आला.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी काम करा, शाळा सक्षम करा - जितीन रहमान

**बीड । प्रतिनिधी**

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या प्रेरणेने तसेच शिक्षण विभाग प्राथमिक व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पर्यवेक्षकीय यंत्रणा सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेला मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये क्रिटिकल थिंकिंग निर्माण करा, आपला इगो बाजूला ठेवा, सर्वांच्या मताचा आदर करा, विद्यार्थ्यांमध्ये पाठांतराऐवजी समज, विश्लेषण आणि उत्तरामागचा का शोधण्याची सवय निर्माण करण्यासाठी काम करा. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढवण्यासाठी काम करा, प्रत्येक मूल वेगळ आहे, त्याला समजून घ्या, प्रत्येक मुलाच्या गरजा वेगळा आहेत त्याला समजून घेऊन त्याच्या आवश्यकतेप्रमाणे त्याला मार्गदर्शन करा व त्याची गुणवत्ता वाढवा, केंद्रस्तरांवर शिक्षकांच्या कार्यशाळा घ्या जे चांगले उपक्रम राबवत आहेत त्यांचे सादरीकरण घ्या व त्या अनुषंगाने आपल्या शाळांमध्ये चांगले उपक्रम राबवून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी काम करा. तसेच शासनाचे सर्व उपक्रम वेळेत पूर्ण करा, निपुण महाराष्ट्र अभियान, णऊखडए, आधार, अपार, विद्यार्थी उपस्थिती नोंदणी, विद्यार्थी सुरक्षितता इ. कामे, शाळा स्वच्छ व सुंदर करा, शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी विशेष उपक्रम राबवा. दर महिन्यातील चौथा शनिवार (पूर्ण दिवस) मी स्वतः विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी देणार आहे, त्यामुळे सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेने उत्साहाने या कामाला लागावे, आपापल्या कार्यक्षेत्रातील शिक्षकांना एकत्र करून चांगल्या उपक्रमांची देवाणघेवाण करून ते उपक्रम शाळांमध्ये राबवा. याचा आढावा दर १५ दिवसाला घेण्यात येणार आहे. असे आवाहन मा. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेला केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक श्रीमती जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी केले, त्यांनी बोलताना बीड जिल्ह्यातील सर्व शाळा सक्षम करण्यासाठी




प्रगतीची दहा सुत्रे सांगितली. या कार्यशाळेत डॉ. अनिल मुरकुटे, प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई यांनी त्यांनी बोलताना पर्यवेक्षकीय यंत्रणेने शाळेवर गेल्यावर शिक्षकांना कसे सहाय्य करायचे व त्यातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढवायची यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले तसेच प्रत्येक भागामध्ये गेल्यानंतर भाषा कशी बदलत जाते या संदर्भात सांगितले त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आवश्यक व कळेल अशा सोप्या भाषेचा वापर करण्यासंदर्भात पर्यवेक्षकीय यंत्रणेला सूचना केल्या. या कार्यशाळेत डॉ. भागीरथी गिरी यांनी ••i-2020, SCF 2024 पायाभुतस्तर, SCF 2024, निपुण भारत/निपुण महाराष्ट्र, पर्यवेक्षीय यंत्रणा भूमिका पायाभूत साक्षरता (मराठी), निपुण भारत अध्ययन निष्पत्ती, मौखिक भाषा विकास, उच्चारशास्त्राची जाणिव, सांकेतिक भाषा व लिपी समजून घेणे या विषयावर मार्गदर्शन केले. श्रीम. देशपांडे प्रतिभा यांनी शब्दसंग्रह, वाचन व आकलन, वाचनातील ओघवतेपणा, मुद्रित साहित्याचे आकलन, लेखन, वाचन संस्कृती, भाषेच्या अनुषंगाने असलेले अध्ययनस्तर, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी श्री. संदिप पवार, मुख्याध्यापक जरेवाडी यांनी शाळा गुणवत्ता पूर्ण करण्यासाठी शिक्षकांनी काय काम करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ.श्री. विकास परदेशी मुख्याध्यापक कारेगव्हाण यांनी शिक्षकांनी गावाचा व पालकांचा सहभाग घेऊन लोकसहभाग कसा घ्यायचा व त्यातून शाळांचा व विद्यार्थ्यांचा विकास कसा करायचा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ.श्री. विकास परदेशी मुख्याध्यापक कारेगव्हाण यांनी शिक्षकांनी गावाचा व पालकांचा सहभाग घेऊन लोकसहभाग कसा घ्यायचा व त्यातून शाळांचा व विद्यार्थ्यांचा विकास कसा करायचा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

श्री. ज्ञानेश्वर तळेकर मुख्याध्यापक दिमाखवाडी यांनी शिक्षकांनी स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश कसे मिळवावे यासाठी काय काय उपक्रम राबवायचे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी नवनियुक्त केंद्रप्रमुखांसाठी आपण येणाऱ्या १०० दिवसात आपल्या केंद्रातील १००% शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी काय करणार यासाठी सर्वांशी चर्चा घडवून आणली व चर्चेतून सर्वांच्या मतानुसार कृती कार्यक्रम तयार करण्यात आला. त्यानूसार येत्या १०० दिवसात कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यावेळी पर्यवेक्षकीय यंत्रणेला जास्तीत जास्त शाळा भेटी देऊन तेथील समस्या सोडविण्यासाठी सुचना करण्यात आल्या आहेत. यावेळी डॉ.अनिल मुरकुटे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई तसेच श्रीमती डॉ.भागीरथी गिरी, श्रीमती प्रतिभा देशपांडे, अधिव्याख्याता, श्री.मारोती जाधव, श्रीमती अंजुम सय्यद शिक्षण विभाग हे उपस्थित होते. यावेळी बालभारतीच्या इ. ६ वीच्या पुस्तकात धाडसी रोहन नावाचा धडा असलेला राजुरी (न) येथील प्रधानमंत्री बाल शौर्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थी चि. रोहन रामचंद्र बहिर यांचा व जि.प.प्रा. शाळा काचरवाडी या शाळेत १ ते ४ वर्गापर्यंत शिकलेला ऊसतोड कामगाराचा मुलगा ज्ञानेश्वर पडवळे ज्यांने काही काळ आई वडिलांबरोबर ऊसतोडणीचे काम केले व जिद्द ,चिकाटी, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर छएएढ २०२६ परिक्षेत ५९० गुण मिळवून चइइड प्रवेशासाठी पात्र होऊन यश संपादन केले त्यांचाही सत्कार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला सदरील कार्यशाळेचे आयोजन व नियोजन श्री.राहूल चाटे, समन्वयक शिक्षण विभाग व श्रीकांत देशमुख यांनी केले होते. या कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी सर्व विस्तार अधिकारी व सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### छत्रपती शिवाजी महाराज

भागातील सामान्य नागरिकांना दिलेली नसून या शिवाय प्रचार आणि प्रसारासाठी आलेला निधीत भ्रष्टाचार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच घेतलेल्या कार्यक्रमात कुठल्याही सामाजिक संघटना व राजकीय पक्षांना निमंत्रण दिले नसल्यामुळे हजारो नागरिकापर्यंत सबंधित कार्यक्रमाची माहिती आलेली नाही त्यामुळे संबंधित तिन्ही माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्याचे तहसीलदार आणि संबंधित मंडळाधिकारी,तलाठी यांच्यासह प्रशासनातले विविध अधिकारी भ्रष्टाचाराच्या कामात गुंतलेले असून त्यांना कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार करण्यास वेळ मिळाला नसल्याची खरमरीत टीका शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाचिटणीस तथा नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### शिक्षण व कला क्षेत्राचा

प्रयत्न केले.कमी विद्यार्थी असलेल्या जिल्हा परिषद शाळा चालू ठेवल्या.खेळ व कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना आवडीच्या क्षेत्रात प्रवेश देऊन शिष्यवृत्ती दिली.उच्च शिक्षण घेऊन व कला क्षेत्रात आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची सोय केली.अज्ञानी व प्रशिक्षित कलावंतांसाठी संत तुकाराम महाराज,संत एकनाथ,यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण,नाट्यगृह बांधून ग्रामीण कलावंतांना संधी दिली.गायन,वादन,नृत्य,संगीतकार उत्कृष्ट कलाकारांना मानधन व पुरस्कार देऊन सन्मान केला असे सांगितले.शासनयोजना राबविणे ग्राम स्वच्छतेत सहभाग व गरजूंना मदत करणे हि दादांची शिकवण कार्यकर्त्यांना सरपंच,जिल्हा परिषद सदस्य पदाकडे घेऊन जाणारी आहे.याप्रसंगी मुख्याध्यापक राम पवार सर,सहशिक्षक बी.आर.पवार,एस.आर.पवार,नरसाळे, लटपटे,सौ.होळकर,पोकळे,वाघमारे,युवा कार्यप्रशिक्षक समृद्धी पटवा अनेक विद्यार्थी व गांवकरी हजर होते.

### आष्टीत २७ जुलै रोजी

दत्तात्रय निलावाड आणि वैशाली पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या शासकीय योजनांशी संबंधित अर्ज, तक्रारी व प्रलंबित प्रकरणांवर मार्गदर्शन करणार आहेत.

समाधान शिबिरामध्ये महसूल, पंचायत राज, कृषी, आरोग्य, पोलीस, सामाजिक न्याय, ग्रामविकास तसेच विविध शासकीय विभागांच्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांच्या अर्जांवर जागेवरच आवश्यक कार्यवाही व मार्गदर्शन करण्यात येणार असून नागरिकांच्या प्रलंबित समस्या तातडीने मार्गी लावण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.या पार्श्वभूमीवर तालुक्यातील नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदारांनी केले आहे.

### पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त


गरजू, पशुधन आणि पर्यावरणाची सेवा हीच त्यांना खरी वाढदिवसाची भेट आहे. त्यामुळे कोणताही दिखाऊपणा न करता समाजहिताचे उपक्रम राबविणे हीच आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी मा. पंकजाताई मुंडे यांना उत्तम आरोग्य, निरोगी, दीर्घ व यशस्वी आयुष्य लाभावे तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला अधिक गती मिळावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण असून कार्यकर्त्यांनी सेवाभावातून वाढदिवस साजरा करत सामाजिक संदेश दिला. या कार्यक्रमास मा. रोहित पंडित, यशराज पंडित, ड. उद्धव रासकर, सचिनजी दाभाडे, अशोक दादा शिंदे, विकास पवार, संतोष थोरात, बळीराम करे, परमेश्वर राठोड, केशव महारनोर, प्रकाश काशीद, किशोर राऊत, शिव केस खरसाडे, संदीप बावस्कर, बाबा पिसाळ, सुनील शेंबडे, सलीम शेख, प्रकाश खेडकर, रामप्रसाद आहेर, सुशील भोपळे, भीमराव जाधव यांच्यासह असंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार धर्मराज आहेर यांनी मानले.

# राज्यातील शेत व पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूला वृक्षारोपण बंधनकारक

मुंबई / प्रतिनिधी

राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकुण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात वन आणि वृक्षाच्छादनाचे प्रमाण २१.२५ टक्के आहे. शासन निर्णयानूसार हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र या अभियानांतर्गत शेत/पाणंद रस्ते यांचे दुतर्फा वृक्ष लागवड करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. नकाशावर घेण्यात आलेल्या सर्व शेत/पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार राज्याचे वनाच्छादन व वृक्षाच्छादन सन २०४७ पर्यंत एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के पर्यंत वाढविण्याकरीता संपूर्ण राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान (सन २०२६-२०४७) राबविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. शेत/पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूस वृक्षलागवडीबाबत खालीलप्रमाणे सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. शेत/पाणंद रस्त्यांची कामे हाती घेण्यापूर्वी शेत/पाणंद रस्ता



अतिक्रमणमुक्त असणे आवश्यक आहे. शेत/पाणंद रस्त्यांची कामे हाती घेण्यापूर्वी रस्त्यांना विशिष्ट क्रमांक दिलेला असावा तसेच संबंधित शेत/पाणंद रस्त्याची भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणी करुन सिमांकन झालेले असावे. राज्यातील सर्व शिव/पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूस उपलब्ध जागेनुसार वन विभागाच्या धोरणानूसार संबंधित जिल्ह्याच्या कृषि हवामान क्षेत्रास अनुरूप अधिसूचित झाडे लावण्याचे नियोजन करावे.

वृक्ष लागवडीचे अभियान हे जिल्हा नियोजन समिती, खनिकर्म निधी, सामाजिक दायित्व निधी, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणे यांच्या योगदानातून राबविण्यात यावे. संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीने वृक्ष लागवडीनंतर किमान १० वर्षे जतन व संवर्धन, नियमित पाणीपुरवठा, पुर्नलागवड, संरक्षण व देखभाल सुनिश्चित करण्यात यावी. वृक्षलागवडीचे मूल्यांकन केवळ लागवड केलेल्या रोपांच्या संख्येवर न करता जिवंत रोपांचे प्रमाण, वृक्षवाढ, हरित आच्छादन व पर्यावरणीय परिणाम यांच्या आधारे करण्यात यावे.

ग्रामपंचायत, शेतकरी गट, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक मंडळे व स्थानिक नागरिकांचा लोकसहभाग प्रोत्साहित करण्यात यावा. दुष्काळ, जनावरांची चराई, आग, कीड व रोग यांपासून संरक्षणासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षरोपणासाठी जागा अपुरी पडल्यास विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा.

# जनावरांना इअर टॅगिंग का केले जाते? जाणून घ्या पिवळ्या पट्टीचे महत्व

देशात दुग्ध व्यवसाय झपाट्याने वाढतो आहे. मात्र, डेअरी व्यवसायामध्ये प्रगती करण्यासह शेतकऱ्यांना अनेक अडथळ्यांमधून जावे लागते. ज्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी जनावरांच्या लसीकरणासह अनेक योजना राबवल्या जातात. या सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या जनावरांची 'इअर टॅगिंग'च्या स्वरूपात पशुपालन विभागाकडे नोंदणी करावी लागते. तेव्हाच शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळतो. त्यामुळे जनावरांची ही 'इअर टॅगिंग' नेमकी का करतात? काय आहेत 'इअर टॅगिंग'चे फायदे?




'इअर टॅगिंग' म्हणजे काय?

अलीकडेच राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी दूध अनुदान योजना लागू केली. त्यासाठी देखील दुधाळ गाईंचे 'इअर टॅगिंग' झालेले असेल तरच अनुदान मिळेल. अशी अट सरकारकडून ठेवण्यात आली. अर्थात इअर टॅगिंग' म्हणजे काय तर आपल्या गायींच्या किंवा जनावरांच्या कानांना पशुपालन विभागाकडून लावला जाणारा पिवळा बिल्ला किंवा पिवळा टॅग होय. या माणसाला ज्याप्रमाणे आधारकार्ड असते. अगदी त्याच पद्धतीने पिवळा टॅग म्हणजे त्या संबंधित जनावराचे आधारकार्ड असते. तो जनावरांच्या कानांना जोडला जाऊन, त्या जनावराची सर्व माहिती विभागाला एका क्लिकवर उपलब्ध होते.

जनावराची संपूर्ण माहिती :जनावरांच्या कानांना जोडलेला हा पिवळा टॅग सरकारला विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खूप महत्वाचा असतो. या टॅगमुळे संबंधित गाय किंवा म्हशीला आतापर्यंत कोणकोणत्या लसी देण्यात आल्या आहेत. याची माहिती तात्काळ समजते. तसेच एखाद्या आजाराची साथ पसरल्यास, अशा जनावराला पटकन लसीकरण करण्यासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे जनावरांना गंभीर आजारांपासून वाचवण्यासाठी या टॅगमुळे मदत होते. याशिवाय या टॅगमुळे जनावराचे वय, त्याच्या मालकाच्या नाव, त्यांचा संपर्क क्रमांक अशी सर्व माहिती उपलब्ध असते. ज्यामुळे दूध अनुदानासारख्या सरकारी योजनांमध्ये गैरव्यवहार न होण्यास मदत होते.

कुठे केले जाते 'इअर टॅगिंग'?

दरम्यान, तुम्हांलाही सरकारच्या दूध उत्पाकांसाठीच्या विविध योजनांचा लाभ घ्यायचा असेल किंवा मग एखाद्या रोगाबाबत जनावरास लसीकरण करायचे असेल. तेव्हा या टॅग खूप गरज पडू शकतो. त्यामुळे तुम्ही आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय विभागात जाऊन, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना भेटून तुमच्या जनावरांना हा टॅग लावून घेऊन शकतात. यासाठी तुम्हाला कोणताही अधिकचा खर्च येणार नाही.

# शेती करण्यासाठी एकरी २० झाडे लावणे आवश्यक

भविष्यात शेती करायची असेल तर प्रति एकर कमीतकमी २० झाडे लावणे महत्त्वाचे आहे, नाहीतर हवामान बदलामुळे शेती बरबाद होईल. झाडाचे महत्व तर सगळ्यांनाच माहिती आहे. भविष्यात शेती करायची असेल तर प्रति एकर कमीतकमी २० झाडे लावणे महत्त्वाचे आहे. नाहीतर हवामान बदलामुळे शेती बरबाद होईल. झाडाचे महत्व तर सगळ्यांनाच माहिती आहे.

झाडांचे वातावरणातील महत्व

:

एक झाड पन्नास वर्षात ३५ लाख रुपये किमतीचे वायुप्रदूषण टाळते. एक झाड १५ लाख रुपये किमतीचे ऑक्सीजन उत्पादन करते. एक झाड ४० लाख रुपये किमतीचे पाण्याचे रिसायकलिंग करते. एक झाड एका वर्षात तीन किलो कार्बन-डाय-ऑक्साईड चा नाश करते. एक परिपूर्ण झाड एक हजार माणसांचे जेवण शिजवण्यासाठी उपयोग येते.

एक झाड आसपासच्या परिसरातील तापमान दोन अंशांनी कमी करते. एक झाड १२ विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तके तयार करण्यासाठी उपयोगी पडते. एका झाडापासून एका कुटुंबासाठी लाकडीसामान तयार होते. एका झाडावर १०० पक्षी घरटे बांधून राहू शकतात व त्यांच्यावर त्यांच्या पंचवीस पिढी जन्माला येतात आणि मधमाशांचे पोळे झाडावर असल्यास तीच संख्या लाखावर जाते. एक झाड अठरा लाख रुपये किमतीची जमिनीची धूप थांबवते. एक झाड माणसाला लहानपणीच्या पांगुळगाड्यापासून ते आराम खुर्ची पर्यंत तसेच म्हातारपणातील हातातील काठी पासून स्मशानातील लाकडा पर्यंत साथ देते.

एक झाड आपल्या पालापाचोळ्याचे भर टाकून जमिनीचा कस वाढवते. एक झाड फळ, फुले व बिया आपल्यासाठी देते. एक झाड पन्नास वर्षात काय करतो आणि आपण माणूस काय करतो याचा लेखाजोखा आम्ही मुद्दामच मांडत आहोत जेणेकरून प्रत्येक माणूस याचा विचार करेल.



# नवीन द्राक्ष बाग लावताना अशी घ्या काळजी

सध्या तरुण मंडळी ची शेती मध्ये येत आहे. ते सगळेजण परंपरागत पिके सोडून आधुनिक पद्धतीने नवनवीन पिके घेण्याकडे त्यांचा भर आहे. जर आपण पाहिले तर तरूणाईचा भर हा शेतीमध्ये फळबाग लागवडीकडे जास्त आहे. परंतु फळबाग लागवड करताना कोणत्या पिकाची निवड कराल हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासोबतच निवड केलेले फळपिके आपल्या जमिनीत येईल का? याचाही विचार करावा. कारण वेगवेगळ्या फळ पिकांच्या बाबतीत काही वेगळे तंत्र असतात. या तंत्राचा अवलंब करणे तितकेच महत्त्वाचे असते.

फळबाग लागवडीमध्ये द्राक्षाची निवड महत्वाची : द्राक्ष बागांचे लागवड केल्यानंतर दीड वर्षात पहिली पीक येते आणि कमीतकमी दहा वर्षांपर्यंत चांगले उत्पन्न मिळू शकते. तसेच मजुरांच्या हाताला देखील वर्षभर काम मिळते कारण द्राक्षबागेत वर्षभर काम असते. आपल्या जवळ असलेली जमीन, पाणी आणि उपलब्ध मनुष्यबळ यांचा चांगल्या पद्धतीने मेळ घालता येतो. द्राक्ष बाग हे एक प्रतिष्ठितपणाचे लक्षण आहे.

द्राक्ष बागाचेसाठी क्षेत्र निवड :या मध्ये लागवड करण्याआधी आपली एकूण जमीन किती आहे? पक्की बागायत आहे का? इत्यादी गोष्टींचा विचार करणे खूप महत्त्वाचे असते. द्राक्ष बागेची लागवड करताना ३४/३७/४२/४६ गुंठे असे आडणीड



क्षेत्र निवडू नका.

जमिनीची निवड :जर आपली जमीन एका ठिकाणी नसूनदोन ते तीन ठिकाणी असेल तर एकाच कुठल्यातरी ठिकाणाची निवड करणे अपेक्षित असते. जमिनीची निवड करताना त्या जमिनीचे क्षेत्र, तिचा सुपीकपना, त्या जमिनीला असलेल्या पाणीपुरवठ्याची साधनांची सोय, वाहतुकीसाठी रस्ता इत्यादी बाबींचा विचार करणे खूपच महत्त्वाचे असते.द्राक्ष बाग लावण्याची वेळ :द्राक्ष बागेची लागवड तुम्ही कधीही करू शकतात. काही अपवाद वगळता मध्य ऑक्टोबर ते जानेवारी च्या मध्यात लागवड करू शकतात. जर लागवड करताना डिसेंबर जानेवारीत केली तर अधिक यशस्वी होते. पहिले पीक पंधरा महिन्याच्या आत हातात येऊ शकते.

द्राक्ष बागेसाठी योग्य वाणाची निवड :ज्या जाती प्रचलित आहेत त्या मधून निवड करणेही उत्तम असते. नवीन द्राक्ष बाग लागवड करताना नवीन,पहिल्यांदा माहीत झालेली द्राक्ष जात लावू नये. प्रचलित जातींपैकी थॉमसन सीडलेस, सोनाका,माणिक चमन,शरद सीडलेस इत्यादी जातींची निवड महत्त्वाची ठरते.

लागवडचे अंतर :द्राक्षांची लागवड करताना दोन ओळीत आठ फूट व दोन वेलीत सहा फूट अंतर असणे आवश्यक आहे. रूट स्टॉक वापरायचा असेल तर दोन ओळीत बारा फूट आणि दोन वेलीत आठ फूट अंतर ठेवावे.

लागवड खड्डे खोदून करावी की चरात :द्राक्ष लागवडीसाठी खड्डे पेक्षा चरांची निवड करणे फायद्याचे असते. चर पद्धती सर्व प्रकारच्या जमिनीसाठी उपयुक्त आहे.चरा चे माप ठरवताना तुमचा जमिनीचा प्रकार कसा आहे यावर ते अवलंबून असते. चराची रुंदी दोन फूट व खोली अडीच फूट किंवा रुंदी अडीच फूट व खोली दोन फूट ठेवावे. तसेच तुमचा जमिनीचा उतार कसा आहे त्यानुसार लांबी ठरवावे. साधारणतः चराची लांबी शंभर फुटांपेक्षा जास्त असू नये.

चरात कोणती खते भरावीत : यासाठी तुमचा जमिनीचा पोत कसा आहे व तुमच्या माती परीक्षण अहवाल यांचा विचार करावा. जर खतांचा विचार केला तर चांगले कुजलेले कंपोस्ट खत १२ टन, जिवाणू युक्त सेंद्रिय खते पाचशे ते एक हजार किलो, कडू पेंड पाचशे ते एक हजार किलो त्यासोबतच हिरवळीचे खत एका एकरातील एका एकरासाठी वापरावे.




## महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित "मिसाईल मॅन" म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
सोमवार दि.२७ जुलै २०२६ ५



# थेरला जिल्हा परिषद शाळेची वर्गखोलीची भिंत मध्यरात्री कोसळली; मोठा अनर्थ टळला

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ; पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निधीची मागणी

पाटोदा। प्रतिनिधी

तालुक्यातील तांबा राजुरी केंद्रांतर्गत थेरला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या जीर्ण झालेल्या वर्गखोलीची भिंत व छत गुरुवारी (दि. २३) मध्यरात्री कोसळल्याने मोठा अनर्थ टळला. सुदैवाने त्यावेळी शाळेला सुटी असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेमुळे जिल्हा परिषद शाळांच्या धोकादायक अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या शाळेचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे.







थेरला येथील इयत्ता दहावीपर्यंतच्या जिल्हा परिषद शाळेत सुमारे २३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन १९६५ मध्ये बांधण्यात आलेल्या शाळेतील पाच वर्गखोल्या अत्यंत जीर्ण झाल्या असून त्यांच्या दुरुस्ती अथवा नव्या बांधकामाची मागणी मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीकडून वारंवार करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, पाच नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम अद्याप अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांना मोडकळीस आलेल्या जुन्याच वर्गखोल्यांमध्ये बसविण्याची वेळ शिक्षकांवर आली होती. पावसाळ्यात धोका अधिक वाढला असतानाच गुरुवारी मध्यरात्री एका वर्गखोलीची भिंत व छत कोसळले. सुदैवाने शाळा बंद असल्याने मोठी दुर्घटना टळली. शाळेचे मुख्याध्यापक प्रताप काळे यांनी सांगितले की, शाळेच्या दुरुस्तीबाबत प्रशासनाला वेळोवेळी कळविण्यात आले होते.

मात्र उन्हाळ्यात आवश्यक दुरुस्ती करण्यात आली नाही. भिंत कोसळल्यानंतर संबंधित वर्गात विद्यार्थ्यांना बसविणे शक्य नसल्याने त्यांना नवीन बांधकाम सुरू असलेल्या वर्गखोल्यांमध्ये बसविण्यात आले आहे.

मात्र तेथे फळा, बसण्याची व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने अध्यापनात अडचणी येत आहेत. याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली आहे. ''राष्ट्रसंत भगवान बाबा दोन दिवस गावात मुक्कामी राहिले होते. त्यांच्या शुभहस्ते लोकवर्गणीतून या शाळेची उभारणी झाली. आज हीच शाळा मोडकळीस आली आहे. पालकांनी वारंवार शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केले. आमच्या लेकरांचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार आहे का?'' असा संतप्त सवाल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश राख यांनी केला. तसेच शाळेच्या नवीन इमारतीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. डॉ. गणेश ढवळे यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून अतिरिक्त ४१ कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील ५८ इमारतविरहित जिल्हा परिषद शाळा आणि ३०२ शाळांमधील ४७५ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ५७ कोटी रुपये, तसेच २९० वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १२ कोटी रुपये, असा एकूण ६९ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या आंदोलनानंतर जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांनी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून २८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र उर्वरित ४१ कोटी रुपयांचा निधी तातडीने मंजूर करण्यात यावा, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे. डॉ. ढवळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी जीव मुठीत धरून शिक्षण घेत आहेत. त्यामुळे कोणतीही दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी आवश्यक निधी उपलब्ध करून धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट, दुरुस्ती आणि नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे.

---

# आमदार खोतकर यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण केला

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड वाटप



जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील मुक्तेश्वर येथे आज आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानात जालना शहरातील झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड (प्रमाणपत्र) वितरणाचा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पीआर कार्डांचे वितरण करण्यात आले. जालना शहरातील झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड मिळावे, यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. तसेच हा प्रश्न विधानसभेतही प्रभावीपणे मांडत संबंधित यंत्रणेला धारेवर धरले.

त्यांच्या पाठपुराव्याला राज्याचे महसूलमंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिसाद देत जिल्हाधिकारी जालना यांना तात्काळ आदेश देऊन कार्यवाही करणेचे आदेश दिले होते,त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून आज अनेक लाभार्थ्यांना आमदार अर्जुन खोतकर यांचे हस्ते पीआर कार्डांचे वितरण करण्यात आल्याने अर्जुन खोतकर यांनी आपण केलेल्या प्रयत्नांना आज खरे मूर्त रूप मिळाल्याने समाधान व्यक्त केले. मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या विशेष अभियानात नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. यावेळी अनेक झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड प्रमाणपत्रांचे वितरण झाल्याने लाभार्थिनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आभार ही मानले. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमंती अशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, महापूर श्रीमती मगरे ,मनपा स्थायी समिती सभापती अशोक पांगरकर, उपमहापूर राजेश राऊतशिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर ,भाऊसाहेब घुगे यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

---

# गायक प्रा. विठ्ठल सूर्यवंशी यांच्या सुमधुर भक्तीगीतांनी भाविक मंत्रमुग्ध

मंठा। प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पवित्र दिनी मंठा येथील गणेश लॉन्स येथे गायक प्रा. विठ्ठल सूर्यवंशी निर्मित ''बोलावा विठ्ठल या भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात उपस्थित भाविक भक्तीच्या सूरांमध्ये मंत्रमुग्ध झाले होते. गायक प्रा. विठ्ठल सूर्यवंशी, अक्षय सूर्यवंशी आणि गायिका धनश्री आडे यांच्या बहारदार भक्तीगीतांनी कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, जिल्हा काँग्रेसचे महासचिव निळकंठ वायाळ, उबाठा शिवसेनेच्या तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, शिवसेना तालुकाप्रमुख तथा



शिवमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष उदयसिंह बोराडे, युवा नेते अजय अवचार, व्यापारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष भारतसेठ बोराडे, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बी जे काळे, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष श्याम काकडे, शिवाजीराव सुरवसे, सौ. सुनीता ताई देशमुख, गणेशराव शहाणे, संतोष शहाणे, आनंदराम सोमानी, सुदामराव खरात, भगवान गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. विकास सूर्यवंशी व सूर्यवंशी परिवाराच्या वतीने प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. पाऊले चालती पंढरीची वाट, कानडा विठ्ठला..., चंद्रभागेच्या तिरी..., काय वाजत गाजतय.. अशा एक ना अनेक भक्तिगीतांनी रसिकांना खिळवून ठेवले. प्रा. विठ्ठल सूर्यवंशी, अक्षय सूर्यवंशी, तसेच गायिका धनश्री आडे यांनी अत्यंत सुमधुर आवाजात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे अभंग आणि भक्तीगीतांनी वातावरण भावपूर्ण झाले होते.आषाढीच्या निमित्ताने आयोजित झालेल्या या कार्यक्रमाला मंठा शहरातील भाविक आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी विठ्ठल बोराडे, नितीन सूर्यवंशी, पवन सूर्यवंशी, योगेश सूर्यवंशी, अनुराग सूर्यवंशी, ऋषिकेश सूर्यवंशी, हर्षद सूर्यवंशी, योगेश सूर्यवंशी, प्रकाश सूर्यवंशी, सुदाम मगर, शेख रफिक यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सौ. ज्योती जाधव यांनी केले.

---

# पाथर्डी आगारात नव्या पाच बस प्रवाशांच्या सेवेत दाखल

पाथर्डी। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पाथर्डी आगारात नव्या ५ बीएस-६ राजमाता जिजाऊ बस दाखल झाल्या आहेत या बस रविवारपासून नियमित प्रवासी सेवेत दाखल होणार असून ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे शेवगाव व पाथर्डी आगारासाठी प्रत्येकी १० नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार मोनिका राजळे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केली होती या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत पहिल्या टप्प्यात शेवगाव आगारासाठी २१ जुलै रोजी ५ नवीन बस दाखल झाल्या असून पाथर्डी आगारासाठीही ५ नवीन राजमाता जिजाऊ बस आगारात दाखल झाल्या आहेत.





उर्वरित बसही दोनही आगारासाठी लवकरच उपलब्ध होणार आहेत पाथर्डी तालुक्यातील बहुसंख्य प्रवाशांच्या मागणीनुसार पाथर्डी तुळजापूर मार्गे अक्कलकोट मुक्कामी गाडी व पाथर्डी गंगापूर मार्गे वैजापूर गाडी सुरू करण्यासाठी प्रवासी संघटनांनी आमदार मोनिका राजळे व परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली होती आता या मार्गावर बसेस सुरू होण्यासाठी तसेच जुन्या बस स्थानकावरील स्वच्छतागृह दोन्ही स्थानकांचे काँक्रिटीकरण व्यावसायिक गाळे अशा तातडीच्या प्रश्नाकडे आमदार राजळे यांनी लक्ष घालण्याची प्रवासी संघटनेची मागणी आहे पाथर्डी आगाराच्या बसेस पाथर्डी तालुक्यातील डोंगराळ दुर्गम भागात व राज्याच्या कानाकोपऱ्यात जात असून बसमधून दरवर्षी लाखो प्रवासी प्रवास करतात यापैकी अनेक बस जुन्या झाल्यामुळे प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन नवीन बस उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू होता यापूर्वीही बीएस-६ प्रकारातील अशोक लेलँड कंपनीच्या १० नवीन बस पाथर्डी आगाराला मिळाल्या होत्या.

---

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**
(दंड विभाग)
दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५
e-mail.tahsildargeorai2@gmail.com
क्रं.२०२५/दंड/कावि-
दिनांक १३.११.२०२५

**प्रती,**
**१ पोलीस निरीक्षक, पो.स्टे**
**२. ग्राम महसूल अधिकारी लोळदगाव**
**विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.**

संदर्भः १. शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/ प्र.क्र २२/कु. क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार बाकले निव्रत्ती साहेबराव रा. लोळदगाव ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २८.०३.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार बाकले निव्रत्ती साहेबराव रा. लोळदगाव ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा बाकले शहादेव निव्रत्ती यांचा जन्म दिनांक २९.०४.२००५ रोजी लोळदगाव येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे. करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी लोळदगाव यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरित
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**
(दंड विभाग)
दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५
e-mail.tahsildargeorai2@gmail.com
क्रं.२०२५/दंड/कावि-
दिनांक १३.१०.२०२५

**प्रती,**
**१ पोलीस निरीक्षक, पो.स्टे**
**२. ग्राम महसूल अधिकारी लोळदगाव**
**विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.**

संदर्भः-१. शासन निर्णय क्रमांक जम्रनों २५२५/ईऑ९९११८१)/ प्र.क्र २२/कु. क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार बाकले निव्रती साहेबराव रा. लोळदगाव ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक २८.०३.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार बाकले निव्रती साहेबराव रा.लोळदगाव ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा बाकले सुमित निव्रत्ती यांचा जन्म दिनांक १५.०८.२००८ रोजी लोळदगाव येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी लोळदगाव यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरित
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

# एकाच दिवसात ५६ गुन्हे दाखल, ७९ ताब्यात; पावणेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध दारू, जुगार व मटका यांसारख्या बेकायदेशीर व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी नांदेड जिल्हा पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात विशेष मास रेड मोहीम राबवली. या मोहिमेंतर्गत पोलिसांनी शहरी व ग्रामीण भागात एकाच वेळी धाडी टाकून ५६ गुन्हे दाखल केले असून ७९ आरोपींवर कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ८ लाख ७७ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभरोहन यांच्या थेट आदेशानुसार ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांनी आपापल्या हद्दीतील संशयित ठिकाणांवर अचानक छापे टाकले. या अचानक झालेल्या कारवाईमुळे जिल्ह्यातील बेकायदेशीर धंदे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दारूबंदी कायद्यान्वये ४५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४७आरोपींवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ६ लाख २३ हजार ३७० रुपयांची अवैध दारू व साहित्य जप्त करण्यात आले. जुगार प्रतिबंधक



कायद्यानुसार ११ गुन्हे दाखल करून ३२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून २ लाख ५३ हजार ८७० रुपयांची रोख रक्कम व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले.

पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर पोलिस अधीक्षक (नांदेड व भोकर) आणि सर्व उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. यामध्ये जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम पोलिस अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी सक्रिय सहभाग घेतला. अवैध धंद्यांविरुद्धची ही मोहीम अशीच नियमितपणे सुरू राहील, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.२७ जुलै २०२६ | ६

# आष्टीत आरोग्यसेवेचा महायज्ञ; मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या नियोजनाला वेग

## आमदार सुरेश धस,रामेश्वरभाऊ नाईक यांच्या उपस्थितीत प्रशासनाची पूर्वनियोजन बैठक

आष्टी । प्रतिनिधी

राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल येथे आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराच्या पूर्वनियोजनाचा आढावा घेण्यासाठी आज प्रशासनासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, महाराष्ट्र राज्याचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक तसेच आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिबिराचे आयोजक सुरेश (अण्णा) धस प्रमुख उपस्थित होते. बैठकीत शिबिराचे नियोजन, रुग्णांची तपासणी, उपचार व्यवस्था, वाहतूक, समन्वय आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार सुरेश धस



यांनी रुग्णांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी तपासणी प्रक्रिया अधिक सहज, सुलभ आणि वेगवान करण्याच्या सूचना दिल्या. मतदारसंघातील प्रत्येक गावातील नागरिकांना त्यांच्या परिसरातील किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक तपासणी करून त्यानंतर पुढील उपचारासाठी आष्टी येथे आणण्याबाबत नियोजन करण्यात आले.

बैठकीत महिलांमध्ये विशेषतः गर्भाशयाच्या आजारांचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागातील व ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्य समस्या, तसेच गुडघेदुखी, कॅन्सर आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक रुग्णांची तपासणी, निदान, उपचार तसेच पुढील शस्त्रक्रिया व विशेष उपचारासाठी आवश्यक ते मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर प्राथमिक तपासणी सुरू करण्यात आली असून तपासणी झालेल्या रुग्णांची अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने दि. ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथे पुढील तपासणी व आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत. या मोफत महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी समन्वयक स्वानंद सोनार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर,उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तहसीलदार निल्लेवाड, वैद्यकीय अधीक्षक रामदास मोराळे,तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कर्मचारी, विविध विभागांचे डॉक्टर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शेळ्या चोरी करणारी कुख्यात टोळी बीड एलसीबी पथकाकडून जेरबंद स्विफ्ट कारसह ४ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त; ६ गुन्हे उघडकीस

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत शेळ्या चोरी करणाऱ्या कुख्यात आंतरजिल्हा टोळीला जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपीसह तिघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार व रोख रकमेसह एकूण ४ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे बीड जिल्ह्यातील वडवणी, नेरूर, धारूर आणि तलवाडा पोलीस ठाण्यांमधील तब्बल ६ गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.



पोलिसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, पोलीस स्टेशन वडवणी येथे गु.र.नं. १३१/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे शेळ्या चोरीचा गुन्हा नोंद झाला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, बीड करत होती. दरम्यान, २५ जुलै २०२६ रोजी पोउपनि महेश विष्णू यांचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी सुभाश किसन विटकर (रा. गांधीनगर, बीड) हा खंडेश्वरी देवी मंदिरासमोर ग्राउंड येथे त्याच्या मित्रासह थांबलेला आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकून सुभाश विटकर, बेग रशीद बेग (रा. बलभीम चौक, बीड) आणि इम्रान चांद शेख (रा. तेलगाव नाका, बीड) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील स्विफ्ट कारची झडती घेतली असता, आरोपींनी वडवणी, धारूर, नेरूर व तलवाडा परिसरातून दिवसा व रात्रीच्या सुमारास शेळ्या चोरल्याची कबुली दिली.

सदर आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली वाहने व रोख रक्कम असा एकूण ४,८५,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कारवाईसाठी तिन्ही आरोपींना पो.स्टे. वडवणी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सहा. पोलीस अधीक्षक श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विष्णू, पोलीस हवालदार बापूसाहेब घोडके, दिलीप गिते, दिपक खाडेकर, नगर पठाण, अर्जुन यादव आणि चालक गणेश मराडे यांनी पार पाडली आहे.

# सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रीदत्त मंदिरामध्ये मोठ्या उत्साहात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा होणार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी : शहरातील नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशीतीलसार्वजनिक सर्वांना आराध्य दैवत असणाऱ्या श्री दत्तगुरु यांच्या मंदिराची स्थापना



प.पू. रघुनाथ महाराज कालकुंदरीकर व प.पू. शामला रघुनाथराव कालकुंद्रीकर यांच्या प्रेरणेने २३ ते ३० जुलै या कालावधीत श्री गुरुपौर्णिमा उत्सव सुरू आहे. २३ ते २५ जुलैदरम्यान श्री गुरुचरित्र, श्री दत्त महात्म्य व श्री स्वात्मसौख्य या ग्रंथांची पारायणे तसेच अखंड पारायण, २६ रोजी श्री सत्यनारायण महापूजा, २७ रोजी श्री गणेशयाग देवता स्थापना २८ रोजी गणेशयाग स्वाहाकार हवन व पूर्णाहूती होणार आहे. २९ जुलैला मुख्य गुरुपौर्णिमा (व्यासपूजा) साजरी करण्यात येणार असून, सायंकाळी आरतीनंतर श्रींची पालखी मंदिरातून निघेल.

सप्ताहाची सांगता येत्या ३० जुलैला दुपारी १ ते ३:३० या वेळेत महाप्रसाद वाटपाने होईल. त्यानंतर सायंकाळी गावातून सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मंदिराच्या जीर्णोत्तरासाठी लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या स्थानिक निधीतून अनेक कामे झाली आहे तरी या गुरुपौर्णिमा उत्साहात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवाचा लाभ घ्यावा.

# शिक्षण व कला क्षेत्राचा अजितदादांनी विकास केला- शहाजी येवले

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जि.प.केंद्रिय प्रा.शाळा पिंपळवंडी येथे बुधवार दि.२२ रोजी सकाळी परिपाठ व दिनविशेष प्रसंगी अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक शहाजी येवले यांनी सांगितले की,महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती आपण सर्वांनी उत्साहाने साजरी केली पाहिजे.महाराष्ट्रातील शैक्षणिक, औद्योगिक,सांस्कृतिक विकासात व आदर्श माणूस घडविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.अजितदादांनी प्रथम सहकार



क्षेत्र,ग्रामविकास व शिक्षण चळवळीसाठी वेळोवेळी काम केले.राज्यातील ग्रामीण भागात शाळा खोली,विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी,क्रीडांगण बांधण्यासाठी निधी दिला.आघाडी शासन काळात मा.कृषीमंत्री शरद पवार, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे शिक्षण, सांस्कृतिक व कला विभागातील अनेक प्रश्न सोडविले.शिक्षकांचे वेतन,तुकडी वाढ प्रशिक्षण यांच्यासाठी निधी देऊन शालेय गुणवत्ता व शिक्षण क्षेत्रातील यश मिळवून खेडेगावातील विद्यार्थी ज्ञान,विज्ञान व सुसंस्कारित करण्यात आले.नियमानुसार शालेय बदल्या व शिक्षक पती-पत्नी बदलांसाठी नियम केले.दादांनी उच्च शिक्षणासाठी तंत्रज्ञानासाठी कृषी,पशुविकास,पर्यावरण विषय वाढ करून अनेक संस्थांना याबाबतच्या अभ्यासक्रमांना मान्यता दिली.विद्या प्रतिष्ठान,तेरणा चॅरिटेबल संस्था,श्री छत्रपती शाहू महाराज संस्था,रयत शिक्षण संस्था,नवले शैक्षणिक संकुलला मदत करून शाळेला योजना व शिक्षकांना बळ देऊन संस्थेच्या सुविधा व गुणवत्ता वाढीसाठी ◀◀ पान ३ वर

# छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचा फज्जा

## संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा -भाई ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघात दि २६ जुलै रविवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचा फज्जा उडाला असून नियोजनाचा अभाव दिसून आलेला आहे. त्यामुळे नागरिक आणि लाभार्थ्यांची गैरसोय झाली असून यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असल्याने संबंधिताची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई ड नारायण गोले पाटील यांनी केली आहे.



शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचणे शिबिराचा उद्देश असतांना प्रशासनातल्या आणि महसूल विभागातल्या अनेक अधिकाऱ्यांनी त्याबाबत कुठेही प्रचार व प्रसार केला नाही.या शिबिराची सामान्य नागरिकांना माहितीच नव्हती, केवळ आमदार महोदयांचे कार्यकर्तेच फोन करून बोलावण्यात आल्याने.या शिबिरापासून हजारो नागरिक वंचित राहिले आहेत.

महसूल प्रशासनासह प्रशासनातल्या अनेक अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी सामान्य नागरिकांची आर्थिक लूट केलेली असून सदरील लुटीचा प्रकार वरिष्ठा समोर येऊ नये म्हणून तसेच अनेक विभागातील कर्मचारी व अधिकारी यांच्या भ्रष्टाचाराचा उहापोह वरिष्ठ अधिकाऱ्या समोर होऊ नये म्हणून त्यांनी या कार्यक्रमाची जाणीवपूर्वक माहिती ग्रामीण ◀◀ पान ३ वर

# आष्टीत २७ जुलै रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर'

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात तसेच शासकीय कामांना गती मिळावी, या उद्देशाने सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालय, नगर-बीड रोड येथे 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



### विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी; नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - तहसीलदार

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार सुरेश (अण्णा) धस राहणार असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत खुबे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामदास मोराळे, गटविकास अधिकारी प्रयाग ठमाळ व संतोष माने, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ओमकार शेळके, अमृत गांगर्डे, तसेच तहसीलदार सुरेश घोळवे, ◀◀ पान ३ वर

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जानकी साहेब गोशाळेत चारा वाटप

## ३०० गाईंना चारा, वृक्षारोपण; श्रीकांत सानप यांचा सेवाभावी उपक्रम

गेवराई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा भाजपच्या ज्येष्ठ नेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी व सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले होते. त्यांच्या या प्रेरणादायी संदेशाला प्रतिसाद देत गेवराई तालुक्यातील मौजे खळेगाव येथे भाजपा नेते श्रीकांत भाऊ सानप यांच्या पुढाकारातून जानकी साहेब गोशाळेत चारा वाटप व वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात



आला. यावेळी गोशाळेतील सुमारे ३०० गाईंना हिरवा चारा वाटप करण्यात आला तसेच परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

मा. पंकजाताई मुंडे यांनी माझा वाढदिवस साजरा करायचा असेल तर गरजू, दिनदुबळे, पशुपक्षी आणि पर्यावरणाची सेवा करून साजरा करा. तहानलेल्यांना पाणी, भुकेलेल्यांना अन्न द्या. वाढदिवसाच्या नावाखाली होर्डिंग, बॅनर किंवा अनावश्यक खर्च करू नका, असा संदेश कार्यकर्त्यांना दिला आहे. त्यांच्या या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवत श्रीकांत भाऊ सानप यांनी असंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह जानकी साहेब गोशाळेला भेट देऊन गोमातेची सेवा केली. यावेळी गोशाळेतील गाईंना पौष्टिक चारा वाटप करण्यात आला. तसेच गोशाळा परिसरात विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाची शपथही घेण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनी गोसेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याची भावना व्यक्त करत सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी श्रीकांत भाऊ सानप यांनी बोलताना सांगितले की, पंकजाताई मुंडे यांनी दिलेला सेवाभावाचा संदेश हा प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील ◀◀ पान ३ वर

# मोरवडमध्ये २,५०० वृक्षारोपण मोहिमेचा जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते शुभारंभ

## शेततळे व ठिबक सिंचनाच्या माध्यमातून वृक्ष संगोपनाचा आदर्श उपक्रम; पर्यावरण संवर्धनासाठी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

वडवणी । प्रतिनिधी

मोरवड ग्रामपंचायतच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम राबवत २,५०० वृक्ष लागवडीच्या महाअभियानाचा शुभारंभ बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे, केवळ वृक्ष लागवड करून थांबण्याऐवजी प्रत्येक वृक्षाचे दीर्घकालीन संगोपन व्हावे यासाठी शेततळे आणि ठिबक सिंचन प्रणालीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने आदर्श ठरत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः वृक्षारोपण करून मोहिमेची सुरुवात केली. त्यांनी ग्रामपंचायतीने पर्यावरणाच्या संरक्षणासाठी हाती घेतलेल्या या अभिनव उपक्रमाचे तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचे मनापासून कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, वृक्षलागवड ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून पुढील पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठीची जबाबदारी आहे. लावलेले प्रत्येक झाड जपले गेले तरच पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे आहे. मोरवड ग्रामपंचायतीने वृक्ष लागवडीसोबतच त्यांची नियमित देखभाल व्हावी यासाठी शेततळे आणि ठिबक सिंचनाची व्यवस्था केल्याने वृक्षांच्या जगण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होणार असून हा उपक्रम इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, गटविकास अधिकारी अशोक बारखोटे, गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, विद्यार्थी, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार सरपंच विवेक आंडील व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. पर्यावरण संरक्षणासाठी गावकऱ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सामूहिक सहभागामुळे मोरवड गावाचा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी आदर्श ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# गुरूपौर्णिमेनिमित्त गजानन महाराज मंदीरात तीन दिवसीय उत्सव

बीड । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त शहरातील सहयोग नगर भागातील संत गजानन महाराज मंदिरात २८ ते ३० जुलै या कालावधीत तीन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण आयोजित करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



उत्सवानिमित्त दररोज सकाळी ८.१० ते १०.२० या वेळेत श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण होणार आहे. पहिल्या दोन दिवसांत प्रत्येकी नऊ अध्याय, तर तिसऱ्या दिवशी उर्वरित तीन अध्यायांचे वाचन करून एकूण २१ अध्यायांचे पारायण पूर्ण करण्यात येणार आहे.मंगळवार, २८ जुलै रोजी दुपारी १२ ते १.३० या वेळेत श्रीआरती व महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. बुधवार, २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार असून श्रीच्या आरतीनंतर दुपारी १२ ते ९ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच गुरुवार, ३० जुलै रोजी दुपारी १२ ते १.३० या वेळेत श्रीआरती व महाप्रसादाने उत्सवाची सांगता होणार आहे.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने होणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊन श्री गजानन महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे अवाहन श्री गजानन सांस्कृतिक मंडळ सहयोग नगर बीड यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26